Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education S.R.No.832-A, Final Plot
No. 178,179, Near Balchitrawani,
Behind Agharkar Research
Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए,
फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी
शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या
मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 I
Email : secretary.stateboard@gmail.com

जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/६४२
पुणे - ४११००४
दिनांक- १३/०२/२०२४

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

**विषय** - मार्च २०२४ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ट होणा-या विदयार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ** :- १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.२०२/ एस.डी.२ दि.२४/११/२०१७.
२) या कार्यालयाचे जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/१७४ दि.१५/०१/२४ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयी संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयानुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयातील तरतुद क्र.०५ नुसार याबाबतचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी शाळेकडे दि.१५ डिसेंबर अखेर व शाळांनी विभागीय मंडळाकडे सदरचे प्रस्ताव सादर करावयाची अंतिम तारीख १५ जानेवारी अशी नमूद आहे.

तथापि शासकीय रेखाकला परीक्षेचा निकाल उशिरा लागल्याने शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे प्रस्ताव सादर करण्यास संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये दि. १० फेब्रुवारी, २०२४ अशी मुदतवाढ देण्यात आलेली होती.

सदर मुदतवाढीनंतर काही तांत्रिक अडचणींमुळे निर्धारीत करण्यात आलेल्या वाढीव मुदतीत माध्यमिक शाळांना अतिरिक्त गुणांचे प्रस्ताव सादर करता आले नसल्याने मुदतवाढीबाबत विविध स्तरावरून मागणी होत असल्यामुळे तसेच कोणताही पात्र विद्यार्थी अतिरिक्त गुणांपासून वंचित राहू नये म्हणून शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे अतिरिक्त गुणांचे प्रस्ताव शुक्रवार, दि. १६ फेब्रुवारी, २०२४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यत माध्यमिक शाळांकडून स्विकारण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे. सदरची मुदतवाढ अंतिम असेल यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

तरी उपरोक्त विहीत मुदतीत सर्व विभागीय मंडळांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर मुदतवाढ आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरुन याबाबत प्रसिध्दी देण्यात यावी व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-४.

क्र.नाविमं/माध्य.व-१/3977
नाशिक ४२२००३
दि.१३/०२/२०२४

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त शाळा,
नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार

उपरोक्त राज्यमंडळाच्या पत्रानुसार कळविण्यात येते कि, शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रकारात सहभागी विद्यार्थ्यांचे परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यास शुक्रवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असून त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी तसेच कोणताही पात्र विद्यार्थी सवलतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

विभागीय सचिवांकरिता,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक ४२२००३

SSC B1

2024/02/13 17:55